# मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

(बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळून)

क्र. झोपुप्रा/प्रशासन/४७५/२०२५ दिनांक :- १५ /१०/२०२५

## जाहिरात

**मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ठाणे कार्यालयासाठी सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांची ११ महिन्यांच्या कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.**

**I) भरावयाची पदसंख्या :**

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | पदाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | सेवानिवृत्त नायब तहसिलदार | ०१ | मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ठाणे |

**II) अर्हता :**

१. **सेवानिवृत्त नायब तहसिलदार :** नायब तहसिलदार पदावरून सेवानिवृत्त अधिकारी असावे.

**III) वयोमर्यादा :** ६५ वर्षांपर्यंत (दि. ०१/१०/२०२५ रोजी)

**IV) नियक्तीचा कालावधी :** ११ महिने (कामगिरी समाधानकारक असल्यास ११ महिने वाढविण्यात येईल.)

**V) मानधन** - सेवानिवृत्त नायब तहसिलदार
सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक :सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३) दि. १०/०६/२०२५ मधील तरतुदीनुसार

**VI) कंत्राटी कामाचे स्वरूप:**

२. **नायब तहसिलदार:** महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास) अधिनियम १९७१ अन्वये जमिन भुसंपादन, बायोमेट्रीक सर्व्हेक्षण, जोडपत्र ३ व ४ नुसार झोपडीधारकांची पात्रता निश्चित करणे, कलम ३३ अ, ३३/३८, ३ झेड, ३ ई अन्वये निष्कासनाची प्रकरणे, वारस प्रकरणे, अपर जिल्हाधिकारी ठाणे कार्यालयाकडील अपिल प्रकरणे, न्यायालयीन प्रकरणे, GRC/AGRC ईत्यादी प्रकरणांबाबत कार्यवाही करणे. मुख्य कार्यकारी अधिकारी व सक्षम प्राधिकारी यांनी निर्देश दिल्याप्रमाणे कामकाज करणे.

**VII) नियुक्तीच्या अटी व शर्ती :**

३. नियुक्तीच्या कालावधीत कंत्राटी पध्दतीने काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील, अशा आशयाचे हमीपत्र/बंधपत्र देणे आवश्यक राहील.

४. शारिरीक/ मानसिक/ आरोग्याच्या दृष्टीने सक्षम आहे व प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक ती क्षमता आहे, असे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

५. सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू अथवा प्रस्तावित नाही. तसेच अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नाही, यासंदर्भातील कागदपत्रे सादर करावी लागतील.

६. सदर सेवा कालावधीत आपले काम समाधानकारक नसल्यास सेवा समाप्त करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंमप्र.झोपप्रा. ठाणे यांना राहील.

७. उपरोक्त अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या अधिकाऱ्यांनी त्यांचे अर्ज **मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे महानगरपालिका मंडई इमारत, खेवरा सर्कल, मानपाडा, ग्लॅडी अल्वारीस रस्ता, ठाणे (प)-४०० ६१०** (ई-मेल- adminoff@mmrsra.gov.in) या पत्त्यावर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून **दिनांक ३० ऑक्टोंबर, २०२५ रोजी सायं. ५.००** वाजपर्यंत सादर करावेत.

**सही/-**
**संदीप माळवी**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**मुंबई महानगर प्रदेश**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे**

D/Deputy Coll 1/Admin Document 2023